# ५. सुगरणीचे घरटे



शाळेच्या परिसरात असलेल्या निंबाच्या झाडावर सुगरण पक्षी घरटे बांधत होता. अतुल, नयना, जॉन व सिमरन रोज तेथे थोडावेळ थांबायचे. सुगरण पक्षी कसे घरटे बांधतो याचे निरीक्षण करायचे. त्याच्या हालचाली त्यांचे मन मोहून टाकायच्या. 'कुठे घाई नाही, गडबड नाही, सगळे कसे नियोजनबद्‌ध.' असे नयना नेहमी म्हणायची. तिला त्याच्या कामातला सफाईदारपणा, नीटनेटकेपणा आवडायचा. जॉनला त्याची चिकाटी तर अतुलला त्याची कष्टाळूवृत्ती भावून जायची. सिमरनला वाटायचे, 'किती मेहनती आहे हा पक्षी! आपल्या सुगरणीसाठी व पिलांसाठी एवढे सुरेख घरटे बांधतो. त्यासाठी अपार मेहनत घेतो. खरंच खूपच जबाबदार व कुटुंबवत्सल पक्षी आहे हा !'

मुले घरटे पाहत असताना गुरुजी तिथे आले. गुरुजींनी मुलांना विचारले, " काय रे मुलांनो, काय पाहत आहात?" मुलांनी घरट्याकडे बोट दाखवले अन् म्हणाले, "गुरुजी, पाहा ना! सुगरण पक्ष्याने किती छान घरटे बांधले आहे." गुरुजींनी घरट्याकडे पाहिले. ते मुलांना म्हणाले, "मुलांनो, सुगरण पक्षी नीटनेटके आणि मजबूत घरटे बांधतो. गवताच्या बारीक पण चिवट काड्या गोळा करतो आणि आपल्या चोचीने सुबक व भारी घरटे विणतो. नक्षीदार वीण पाहूनच या पक्ष्याला 'सुगरण' असे म्हणतात. अशी सुबक आकाराची सुरेख घरटी तो बांधत असतो. सुगरणमादी त्याचे निरीक्षण करते. राहण्यास योग्य व मजबूत असेल अशा घरात राहणे ती पसंत करते. निंब, बाभळीच्या झाडाच्या फांदीला हे घरटे झोक्यासारखे टांगलेले असते. वादळातही हे घरटे शाबूत राहते. त्याच्या घरट्याची सर कोणत्याही इतर पक्ष्याच्या घरट्याला येत नाही. गुरुजींनी सुगरण पक्ष्याची वाखाणणी केली.

बऱ्याच दिवसांनी पुन्हा मुले निंबाच्या झाडाजवळ आली. पाहतात तर काय सुगरण पक्ष्याचे घरटे बांधून पूर्ण झाले होते. झाडाच्या फांदीवर बसून घरट्याचे निरीक्षण करणारी सुगरण त्यात राहायला आली होती. नयना म्हणाली, "सुगरण पक्षी किती आकारबद्‌ध घरटे बांधतो, तेही चोचीने. आपल्याला असे घरटे तयार करता येईल का? किती कसबी विणकर आहे हा पक्षी!"

**शब्दार्थ : मजबूत** – पक्के. **सुबक** – सुंदर. **शाबूत राहणे** – टिकून राहणे. **सर येणे** – बरोबरी करणे. **वाखाणणे** – स्तुती करणे. **कसब** – कौशल्य. **विणकाम** – धागे एकमेकांत गुंफून विणण्याचे काम.



## स्वाध्याय

**प्र. १. एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) सुगरण पक्षी घरटे कशापासून बनवतो?

(आ) सुगरण पक्षी घरटे कुठे बांधतो?

(इ) सुगरण पक्ष्याचा महत्त्वाचा गुण कोणता?

**प्र. २. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सुगरण पक्षी सुबक वीण कशाने घालतो?

(आ) सुगरण पक्ष्याचे हे घरटे वादळात शाबूत का राहते?

(इ) नयना सुगरण पक्ष्याबद्दल काय म्हणाली?

(ई) सुगरण पक्षी कुटुंबवत्सल कसा? ते लिहा.

(उ) सुगरण पक्ष्याला कसबी विणकर का म्हटले आहे?

**प्र. ३. वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| अ.क्र | 'अ' गट | अ.क्र | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | शाबूत राहणे | (१) | बरोबरी करणे |
| (आ) | वाखाणणे | (२) | टिकून राहणे |
| (इ) | सर येणे | (३) | स्तुती करणे |

**प्र. ४. खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**


(अ) सुबक (आ) कसब (इ) चिकाटी (ई) मजबूत

**प्र. ५. तुम्हांला या पाठातून काय शिकायला मिळाले ते लिहा.**

**प्र. ६. तुम्ही सुगरण पक्ष्याचे घरटे पाहिले आहे का? त्याचा आकार तुम्हांला कसा वाटला? त्याचे वर्णन करा.**

**प्र. ७. खाली काही शब्द दिलेले आहेत, त्यांपैकी सुगरण पक्ष्याला लागू होणारे शब्द शोधून आकृती पूर्ण करा.**

नीटनेटकी, चिकाटी, आळशी, जबाबदार, सहनशील, कष्टाळू, स्तुतिप्रिय, निर्दयी, झोपाळू.




**प्र. ८. सुगरण पक्ष्याप्रमाणे तुमच्यात जर चिकाटी असेल, तर कोणकोणती कामे तुम्ही चांगली करू शकाल ते सांगा.**

उपक्रम : तुम्ही पाहिलेले पक्षी व त्यांची घरटी यांची चित्रे गोळा करून एका मोठ्या कागदावर चिकटवा. त्याखाली त्यांची नावे लिहून तक्ता तयार करा.

- खालील वाक्ये वाचा.

| | | |
|---|---|---|
| तो फळा | ती वही | ते फळ |

जेव्हा आपण एखाद्या शब्दाच्या आधी **'तो'** लावतो तेव्हा तो पुल्लिंगी शब्द, **'ती'** लावतो तेव्हा स्त्रीलिंगी शब्द, **'ते'** लावतो तेव्हा नपुंसकलिंगी शब्द म्हणतो.

आणखी काही उदाहरणे वाचा. वाक्ये लिहिताना त्याप्रमाणे लिहा.

| | | |
|---|---|---|
| तो वाडा | ती इमारत | ते घर |
| तो भात | ती भाकरी | ते पेन |

## आपण समजून घेऊया.

मीना हुशार मुलगी आहे. मीनाच्या भावाचे नाव मिहीर आहे. मीना मिहीरला 'दादा' म्हणते. मिहीर मीनाला 'ताई' म्हणतो. मीना आणि मिहीर एकाच शाळेत शिकतात. मीना आणि मिहीर यांच्यात कधीच भांडणे होत नाहीत. मीना मोठी असल्याने मीना मिहीरची काळजी घेते.

वरील परिच्छेदात मीना आणि मिहीर या भावंडांचे वर्णन आले आहे. मीना व मिहीर या शब्दांऐवजी दुसरे शब्द वापरून तयार केलेला पुढील परिच्छेद वाचा.

मीना हुशार मुलगी आहे. तिच्या भावाचे नाव मिहीर आहे. ती त्याला 'दादा' म्हणते. तो तिला 'ताई' म्हणतो. ते एकाच शाळेत शिकतात. त्यांच्यामध्ये कधीच भांडणे होत नाहीत. ती मोठी असल्याने त्याची काळजी घेते.

मीना आणि मिहीर या नामांऐवजी आपण येथे **तिच्या, ती, त्याला, तो, तिला, ते, त्यांच्या, ती, त्याची** असे शब्द वापरले आहेत.

**या शब्दांना सर्वनाम म्हणतात. नामाऐवजी आपण जो शब्द वापरतो, त्या शब्दास सर्वनाम म्हणतात.**

- खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.

(अ) मी कुमारला हाक मारली.
(आ) तुला नवीन दप्तर आणले.
(इ) त्याचा फोटो छान येतो.
(ई) मी त्यांना सुविचार सांगितला.
(उ) त्याने घर झाडून घेतले.
(ऊ) आपण पतंग उडवूया.

- खालील परिच्छेद वाचा व त्यातील सर्वनामे अधोरेखित करा.

सलीम नुकताच शाळेत दाखल झाला होता. त्याला शाळेत करमत नव्हते. तो त्याच्या आईबरोबर शाळेत यायचा. तेवढ्यात त्याला त्याची मैत्रीण दिसली. सलीम त्याच्या आईला म्हणाला, ''तू जा. मी आज तिच्याबरोबर घरी येईन.''